महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेण्यात आलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पुण्यात जाहीर केला. या परीक्षेसाठी यंदा राज्यातल्या नऊ विभागीय मंडळातून १४ लाख २३ हजार ९७० नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १३ लाख २९ हजार ६८४ जण उत्तीर्ण झाले आहेत, याची टक्केवारी ९३ पूर्णांक ३७ शतांश टक्के इतकी आहे. गेल्यावर्षी पेक्षा यंदा २ पूर्णांक १२ टक्क्यांनी निकाल वाढला आहे. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींचं प्रमाण अधिक असून त्याची टक्केवारी ९५ पूर्णांक ४४ शतांश टक्के इतकी आहे. तर ९१पूर्णांक ६ दशांश टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत. यंदा कोकण विभागात सर्वाधिक ९७ पूर्णांक ५१ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, तर मुंबई विभागाचा निकाल सर्वात कमी असून त्याची टक्केवारी ९१ पूर्णांक १५ शतांश टक्के इतकी आहे. पुणे विभागाचा निकाल ९४ पूर्णांक ४४ शतांश टक्के इतका लागला आहे. शाखानिहाय निकालात यंदा विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचं प्रमाण सर्वाधिक असून यात ९७ पूर्णांक ८२ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

<><><><><>

लोकसभा निडवणुकीच्या पाचव्या टप्प्यात काल राज्यातल्या १३ मतदारसंघांमध्ये मतदान झालं. एकंदर ५४ पूर्णांक ३३ शतांश टक्के मतदान झाल्याचं निवडणूक कार्यालयानं कळवलं आहे. यापैकी सर्वाधिक ६२ पूर्णांक ६६ शतांश टक्के मतदान दिंडोरी मतदारसंघात, त्याखालोखाल ६१ पूर्णांक ६५ शतांश टक्के मतदान पालघर जिल्ह्यात झालं. तर दक्षिण मुंबई

मतदारसंघात सर्वात कमी, ४७ पूर्णांक ७ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

धुळ्यात ५६ पूर्णांक ६१ शतांश टक्के,
नाशिकमध्ये ५७ पूर्णांक १० शतांश टक्के,
भिवंडीत ५६ पूर्णांक ४१ शतांश टक्के,
कल्याणमध्ये ४७ पूर्णांक ८ शतांश टक्के, तर ठाणे मतदारसंघात ४९ पूर्णांक ८१ शतांश टक्के मतदान झालं.
उत्तर मुंबईत ५५ पूर्णांक २१ शतांश टक्के,
उत्तर मध्य मुंबईमध्ये ५१ पूर्णांक ४२ शतांश टक्के,
उत्तर पूर्व मुंबई मतदारसंघात ५३ पूर्णांक ७५ शतांश टक्के,
उत्तर पश्चिम मुंबईत ५३ पूर्णांक ६७ शतांश टक्के तर दक्षिण मध्य मुंबईत ५१ पूर्णांक ८८ शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

याबरोबरच लोकसभा निवडणुकीची राज्यातली प्रक्रिया पूर्ण झाली. आत्तापर्यंतच्या पाच टप्प्यांमध्ये देशभरातल्या एकंदर ४२८ लोकसभा मतदारसंघांमध्ये मतदानाची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

<><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मतदान प्रक्रिया सुरू असताना पत्रकार परिषद घेऊन मतदारांची दिशाभूल केल्याचा आरोप भाजपाने केला आहे. यासाठी ठाकरे यांच्यावर कारवाई करावी, अशी तक्रार मुंबई भाजपाचे अध्यक्ष आशिष शेलार यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. मोदी सरकार पराभवाच्या भीतीने निवडणूक आयोगाचा वापर करत आहे. आयोगाचे प्रतिनिधी मतदान प्रक्रियेत दिरंगाई करत आहेत, असा

आरोप उद्धव ठाकरे यांनी काल केला होता. हे आचारसंहितेचे उल्लंघन आहे, असं भाजपाने म्हटलं आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात मतदान करणाऱ्या देशवासीयांचे समाज माध्यमावर लिहिलेल्या पोस्ट मध्ये आभार मानले आहेत. गेल्या ३५ वर्षांत सर्वाधिक मतदानाची नोंद झाल्याबद्दल जम्मू काश्मीरच्या बारामुल्ला जिल्ह्यातल्या नागरिकांचीही त्यांनी प्रशंसा केली आहे.

<><><><>

माजी प्रधानमंत्री दिवंगत राजीव गांधी यांच्या स्मृतीदिनानिमित्त देश त्यांना आदरांजली वाहत आहे.  प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राजीव गांधी यांना समाजमाध्यमावरून आदरांजली वाहिली. तसंच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी नवी दिल्लीत वीर भूमी इथं राजीव गांधी यांच्या स्मृतीस्थळावर जाऊन अभिवादन केलं. राजीव गांधी यांचा स्मृतीदिन देशात दहशतवाद विरोधी दिन म्हणून पाळला जातो.

<><><><>

मुंबई महानगर पालिका पावसाळापूर्व नालेसफाई कामात निष्काळजीपणा दाखवत असल्याचा आरोप मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी केला आहे. पालिकेने ७५ टक्के नालेसफाई झाल्याचा केलेला दावा खोटा असून नालेसफाईच्या कामाबाबत मुंबई महापालिका आयुक्तांनी श्वेतपत्रिका  काढावी अशी मागणी त्यांनी केली आहे. पश्चिम उपनगरातल्या नालेसफाईच्या कामाची पाहणी केल्यानंतर आज ते वार्ताहरांशी बोलत होते.

//<><><><>//